# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र,

ई-मेलव्दारे

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि/२०१३/प्र.क्र.९/का-८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - १७/०७/२०१३

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)
(मुंबई व बृहन्मुंबई जिल्हा वगळून)

**विषय :- माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०१३ या कालावधीत मुदती संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता प्रभाग रचना व आरक्षणाचा सुधारीत कार्यक्रम.**

**संदर्भ :-** १) आयोगाचे सम क्रमांकाचे दिनांक २२/०४/२०१३ चे पत्र
२) आयोगाचे सम क्रमांकाचे दि. १७/०७/२०१३ चे आदेश

महोदय,

माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०१३ या कालावधीत मुदती संपणाऱ्या आणि नव्याने निर्मित व विभाजनामुळे अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतीची तसेच न्यायालयीन आदेशामुळे प्रभाग रचनेसह निवडणुका घेणे आवश्यक आहेत अशा ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १ ते ७ टप्प्यातील प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमाबाबत आपल्याकडून आयोगाच्या वरील संदर्भीय क्र. १ च्या पत्रान्वये याआधीच कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि, भारत सरकारच्या जनगणना कार्यालयाकडून वर्ष २०११ च्या जनगणेची अंतिम आकडेवारी प्रसिध्द झाली असल्याकारणाने उक्त संदर्भांकीत क्र. २ च्या आदेशान्वये या आधी अंतिम करण्यात आलेला प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम रद्दबातल करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर उक्त कालावधीत मुदती संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम नव्याने देण्यात येत आहे. त्यानुसार सदस्य संख्या निश्चित करणे, प्रभाग रचना व जागांचे आरक्षण करणे इत्यादी करीता **सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी विचारात घ्यावी** आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व महाराष्ट्र ग्रामपंचायत (प्रभाग रचना, आरक्षण इत्यादीबाबत) नियम १९६६ तरतुदीनुसार प्रभाग रचना, जागांचे आरक्षण चक्रानुक्रम इत्यादीबाबत कार्यवाही करण्यात यावी. वाड्या वस्त्या इत्यांदीचे क्षेत्र (भू-मापन क्रमांक, गट क्रमांक इत्यादी) ज्या ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात समाविष्ट आहे त्या ग्रामपंचायतीच्या प्रभागात सदर वाड्या, वस्त्या इत्यादींचा समावेश करून प्रभाग रचना व आरक्षणाचा तसेच चक्रानुक्रमे आरक्षण देण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ३०/०८/२००५ व दिनांक १९/०६/२००७

च्या सूचनानुसार कार्यवाही करण्यात यावी आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम तसेच प्रभाग रचना व आरक्षण इत्यादीबाबतच्या नियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

शासनाच्या सन २०११ च्या महाराष्ट अध्यादेश क्रमांक १९, दिनांक २१ एप्रिल, २०११ अन्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १०(२) मधील खंड (ब), (क) व (ड) मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार स्त्रियांकरीता ग्रामपंचायतींच्या एकूण जागांचे १/२ जागा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी स्त्रियांकरीता राखून ठेवलेल्या जागा धरून) स्त्रियांसाठी राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भाधिन दिनांक १३/०५/२०११ चे आदेश व दि. १६/०५/२०११ ची दोन मार्गदर्शनपर पत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमानुसार करण्यात येणाऱ्या कार्यवाहीवाबतची टप्पानिहाय माहिती, टप्पा पूर्ण होताच ई-मेलव्दारे आयोगास सादर करण्यात यावी. तसेच अंतिम प्रभाग रचना, आरक्षित जागा इत्यादीबाबतचा तपशील प्रसिध्द झाल्यानंतर सदर माहिती, या पत्रासोबत जोडलेल्या नमुना-१ मध्ये आयोगास **ई-मेलव्दारे** सादर करण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

आपली,

(पूनम शिरसोळकर)
सहायक आयुक्त
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी आदेशित केलेला माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या तसेच विभाजनामुळे व नव्याने अस्तित्वात आलेल्या स्वतंत्र ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षणाचा सुधारीत कार्यक्रम.**

| | | |
|---|---|---|
| १ | मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे ) नियम,१९६६मधील नियम२-अ प्रमाणे ग्रामपंचायतीसाठी एकूण सदस्य संख्या ठरविणे व नियम ३ प्रमाणे प्रारुप प्रभागरचना करणे. | दिनांक २२/०७/२०१३ सोमवार पर्यंत |
| २ | प्रारुप प्रभाग रचनेला प्राधिकृत अधिकाऱ्याने मान्यता देणे | दिनांक २५/०७/२०१३ गुरूवार पर्यंत |
| ३ | मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ मधील नियम ४, ४-अ, ४-अअ व ४-ब च्या तरतुदीनुसार आरक्षणासाठी सोडत पध्दतीने प्रभागाचे आरक्षण ठरविणे | दिनांक २९/०७/२०१३ सोमवार पर्यंत |
| ४ | मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ मधील नियम २-अ नुसार प्रारुप प्रभाग रचना, आरक्षणाबाबत नियम ५ मधील पोट नियम (२) च्या "नमुना ब" अन्वये हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहीर सूचना प्रसिध्द करणे | दिनांक ३०/०७/२०१३ मंगळवार |
| ५ | मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ मधील तरतुदीनुसार व नियम ५ मधील पोटनियम (२) च्या "नमुना ब" मध्ये नमूद केल्यानुसार हरकती सादर करण्याची अंतीम तारीख | दिनांक ०३/०८/२०१३ शनिवार पर्यंत |
| ६ | मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे ) नियम, १९६६ मधील नियम ५ पोटनियम (२) मधील तरतुदीनुसार "नमुना ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे मागविलेल्या ज्या हरकती व सूचना प्राप्त झाल्या, त्यावर निर्णय घ्यावयाचा अंतिम दिनांक | दिनांक ०८/०८/२०१३ गुरूवार पर्यंत |
| ७ | मुंबई ग्रामपंचायती (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि पदांचे आरक्षण ) नियम, १९६६ मधील नियम ५ मधील पोटनियम (१) मधील "नमुना अ" मध्ये अंतीम प्रभाग रचना, आरक्षित जागा वगैरेचा तपशील प्रसिध्द करणे | दिनांक १२/०८/२०१३ सोमवार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे,

(पूनम शिरसोळकर)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
आदेश क्र. रानिआ/ग्रापंनि२०१३/प्र.क्र.९/का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक : - १७/०७/२०१३.

**आदेश**

ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत (गावाचे प्रभागात विभाजन करणे आणि स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा राखून ठेवणे) नियम,१९६६ मधील नियम २-अ मधील तरतुदीनुसार प्रत्येक पंचायतीत प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या निश्चित करण्यासाठी ज्या जनगणनेची संबंधित आकडेवारी प्रसिध्द करण्यात आलेली आहे अशा निकटपूर्वी झालेल्या जनगणनेच्यावेळी ठरवलेली त्या गावाची लोकसंख्या विचारात घेणे आवश्यक आहे,

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकाच्या दि.२२/०४/२०१३ च्या पत्रान्वये माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०१३ या कालावधीत मुदती संपणाऱ्या आणि नव्याने निर्मीत व विभाजनामुळे नव्याने अस्तित्वात आलेल्या तसेच न्यायालयीन आदेशामुळे निवडणुका घेणे आवश्यक असलेल्या ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम देण्यात आलेला होता व या कार्यक्रमानुसार सन २००१ च्या जनगणनेची आकडेवारी विचारात घेऊन ग्रामपंचायतींची प्रभाग रचना अंतिम करण्यात आली आहे,

आणि ज्याअर्थी, वरीलप्रमाणे प्रभाग रचना अंतिम करण्यात आल्या नंतर भारत सरकारच्या जनगणना कार्यालयाकडून सन २०११ च्या जनगणनेची अंतिम आकडेवारी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे यापुढील काळात होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीची सदस्य संख्या निश्चित करणेबाबतची तसेच प्रभाग रचनेची कार्यवाही सन २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे करणे आवश्यक झाले आहे,

त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या दि.२२/०४/२०१३ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार करण्यात आलेली ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे. यापुढील काळात होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना करण्यासाठीचा कार्यक्रम स्वतंत्ररित्या देण्यात येईल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(पूनम शिरसोळकर)
सहायक आयुक्त
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (जिल्हाधिकारी मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)